RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Refereed Research Journal**

**• Editor •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com,
Shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

**Vol. I, Issue - VII**
**Apr.-June 2017**

**Publisher's Name :**
Saw. Lata Sadashiv Sarkate
Indian
C/o Dr.S.H.Sarkate
Art's, Commerce & Science college, Gadhi Tq. Georai, Dist. Beed 431143(MS)

**Place of Publicatioin :**
Georai Tq. Georai, Dist. Beed 431143(MS)

**Printer Name :**
Saw. Sarkate Lata Sadashiv
Indian
C/o Dr.S.S.Sarkate
Art's, Commerce & Science College, Gadhi Tq. Georai, Dist. Beed 431143(MS)

**Printing Press & Address :**
**Shradha Enterprizes**
Opp.Tahsil Office,Nagar Road, Beed Tq.& Dist.Beed -431122(MS)

Editor's Name
**Sarkate Sadashiv Haribhau**
Indian
Dr.S.S.Sarkate Arts Commerece & Science College, Gadhi Tq. Georai Dist. Beed

Owner(s) Name
**Sarkate Lata Sadashiv**
(Individuals)

**Price :** Rs. 300/-

**EDITOR**

***Sarkate Sadashiv Haribhau***
Dr.S.S.Sarkate Art's, Commerce & Science college, Gadhi
Tq. Georai, Dist. Beed

**ADVISORY**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chancller Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. B.V. Bhise**
Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Borade Narayan**
M.S.S.College, Jalna

**Hon. Dr. Paralakar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**EDITOR BOARD**

**Dr.Shirish Patil**
Dean, Faculty of Arts
N.M.University Jalgaon

**Dr.Bharat Handibag**
Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vilas Khandare**
Dean, Faculty of Social Sciences
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Nozar Niari**
Khorrambad, Iran

**Dr.Sameer Sayyed**
Professor of Hindi Arts, Comm.& Sci.College Shrirampur

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Appasaheb Humbe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Ulhas Shinde**
Dean, Faculty of Engineering
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Pratibhatai Patil**
Management Council Member & Professor & Head, Dept.of Pub.Adm.
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Snehal Taware**
Chairman : BOS in Marathi
University of Pune, Pune

**Haim Landqist**
Notodden university, Norway

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College, Phulambri Dist. Aurangabad

**Dr. Shantaram Shelar**
Associ.Prof. Night College, Echalkaranji

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr. Ratandeep Deshmukh**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

# Guidelines for Writers

- "Power of Knowledge" the referred research journal has permission and registered of RNI, Ministry of Information and Broadcasting, Govt. of India

  Research papers in all subjects of all faculties in Hindi, English, Marathi will be published in "Power of Knowledge".

- Research scholars should sent their papers in Marathi, Hindi and English on one side typed papers. It should be in Pagemaker or word format with a CD. Scholars should send their papers through registered / speed post. A Xerox copy of papers should be enclosed.

- The writer should give a letter of undertaking that he / she has not violated copy right act and the whole responsibility will not be liable of any legal action. This undertaking is compulsory with the research paper.

- Directions regarding fonts

  English **Times New Roman or any 12** font

  Hindi & Marathi **ISM DVB TT- Surekh Pagemaker.**

- Research paper should be in A-4 size upto 4-5 pages, value language and references should be mentioned.

- There should not be grammatical mistakes.

- If the research paper published in "Power of Knowledge" not accepted by Research Recognition Committee/University Body/other research related committees, the Editor/Printer/Publisher will not take any responsibility of the same.

- All the postal contact should be to the address of editor through registered post only.

- Despute shall be subject to hearing at Hon'ble BEED (M.S.) Jurisdiction only.

Ideas expressed in "Power of Knowledge" belongs to the writer exclusively. The editor, publisher & printer of "Power of Knowledge" have nothing to do it with them. At the same time it is made clear that if writers violate copyright act, they will be responsible for their own action. Hence, it is clarified from editor, publisher and printer's side.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | संघर्षमय वाटचालीची आत्मकहाणी, 'मी भरुन पावले आहे' | प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर (अल्लडवाड) | १ |
| २ | आदिवासी मराठी साहित्य | प्रा.डॉ.भारत हंडीबाग | ६ |
| ३ | ग्रामीण कादंबरी आणि समाजवास्तव | प्रा.डॉ.पंढरी डोईफोडे | ९ |
| ४ | समाज व्यवस्थेने दलित समाजाच्या पायात टाकलेली कायमची "जलमबेडी" | प्रा. डॉ. संजय शिंदे | ११ |
| ५ | आशा बगे यांची कादंबरी | प्रा.डॉ.सविता मा.पवार | १५ |
| ६ | नामदेव ढसाळ यांचा "गोलपिठा" | प्रा.बापू घोक्षे | २३ |
| ७ | दलित साहित्य : प्रेरणा: स्वरुप आणि भूमिका | प्रा. विठोबा दामोधर मस्के | २९ |
| ८ | दलित साहित्यातील स्त्रीयांची आत्मकथने | प्रा.डॉ.सदाशिव हरिभाऊ सरकटे | ३३ |
| ९ | महाराष्ट्रातील अदिवासी कोळी निसर्ग व संस्कृतीला जपणारी जमात | प्रा.डॉ.अरूण कोळी | ३६ |
| १० | प्रिया तेंडूलकर यांच्या कथेतील स्त्री चित्रण | प्रा. प्रल्हाद होंडे | ४० |
| ११ | जीवन पद्धतीचा चिंतन गर्भ आविष्कार: बहिणाबाईची गाणी | प्रा.रमेश रिंगणे | ४३ |
| १२ | "जातीजमातींच्या लोकसाहित्याची समाज उपयोगीता" | डॉ.रामनाथ गंगाधर वाढे | ४७ |
| १३ | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | सुधीर बब्रुवान मोरे | ५१ |
| १४ | संत एकनाथांच्या भारुडातील सामाजिकता | डॉ.हंसराज जाधव | ५७ |
| १५ | प्रबुद्ध विचारांचा सम्यक लेखक योगीराज वाघमारे | प्रा.सुनिता बोराडे | ६१ |
| १६ | संत नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्रातून वास्तव व अनुभूतीचे चित्रण | डॉ.चव्हाण बाळासाहेब संतू | ६४ |
| १७ | अज्ञेय की काव्य - रचना विषयक धारणाएँ : एक अनुशीलन | डॉ. नामदेव जासूद | ६८ |
| १८ | कबीरदास के व्यक्तित्व पर आधारित हिंदी नाटकों में सामाजिकता | प्रा. डॉ. बाळासाहेब सोनवणे | ७४ |
| १९ | डॉ. श्रीराम परिहार के ललित निबंधो में लोकजीवन और ग्राम्य प्रकृति | प्रा. डॉ. जितेंद्र पिताम्बर पाटील | ७७ |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | कबीर की भक्ति पद्धति | प्राचार्य डॉ.सौ. मेहेर एस.आर. | ८२ |
| २१ | नारी मन की चितेरी कथाकार - सूर्यबाला | प्रा.बिटोरे कन्नुलाल आसाराम | ८६ |
| २२ | Dr Panjabrao Deshmukh : A Son Of Soil | Dr Archana Bobade | ८९ |
| २३ | HIGHER EDUCATION : SC/ ST STUDENTS : OPPORTUNITIIS AND ADVERSITIES IN MARATHWADA REGION | UMAKANT N. NETRAGAONKAR | ९२ |
| २४ | Experiment in Engaging men in Gender Equality | Ramesh Nanaji Gavit | १०० |
| २५ | आष्टी तालुक्यातील शेतक-यांच्या कृषीविषयक आर्थिक समस्या | डॉ. अशोक कोरडे | १०५ |
| २६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय लोकशाही | प्रा.पार्वती सुंदऱ्या पाडवी | ११० |

# संत नामदेवांच्या ज्ञानेश्वर चरित्रातून वास्तव व अनुभूतीचे चित्रण

**डॉ.चव्हाण बाळासाहेब संतू**
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव

तेराव्या शतकापासून चालत आलेल्या 'चरित्र-आत्मचरित्र' या लेखनाच्या परंपरेत नामदेवचरित्रांना महत्त्व आहे. नामदेवकृत 'ज्ञानेश्वरचरित्र' अतिशय वेगळेपणाने लिहिलेले असून ते रसपूर्ण आहे. 'आदी', 'तीर्थावळी' आणि 'समाधी' ही तीन प्रकरणे या ज्ञानेश्वरचरित्राचे घटक आहेत. एकूण साडेतीनशे अभंगांनी बनलेल्या या चरित्रात ज्ञानदेवांचा पूर्वजवृत्तांत, जन्म, बालपण, त्यांना सोसावी लागणारी निंदा, त्यांच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग, चमत्कार आणि समाधिप्रसंग वगैरे सर्व गोष्टीचे वर्णन नामदेवांनी केलेले आहे. हे वर्णन नामदेवांच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचा प्रत्यय घडविते. अतिशय हळुवारपणे-प्रेमळपणे नामदेवांनी आपल्या भावनांचा आविष्कार घडविला आहे. यातही सत्याचा जराही आपलाप नामदेवांनी कोठेही होऊ दिला नाही. त्यामुळे नामदेवकृत 'ज्ञानेश्वरचरित्र ('आदि','तीर्थावळी','समाधी') हा फार मोलाचा इतिहासग्रंथ ठरतो. नामदेवांनी 'ज्ञानेश्वरचरित' आणि अन्य संताची चरित्रे अभंगाच्या माध्यमातून लिहून एका नवीन परंपरेचा प्रारंभ केला. नामदेवांना मराठीतील पहिले पदय चरित्रकार ठरविण्याचे कार्य या अभंगानी केले आहे. नामदेव चरित्रलेखनाचे स्वरुप, प्रेरणा, प्रयोजन, उद्दिष्ट व प्रक्रिया या महानुभावीय चरित्र लेखनाहून वेगळया आहेत. नामदेवांच्या चरित्रलेखनाची प्रेरणा मुख्यतः भक्ती हीच आहे. संताविषयीच्या भक्तिभावाने नामदेवांनी त्यांच्या चरित्रकथा लिहिलेल्या आहेत. वर्ण्य विषयाशी तन्मय होऊन त्याचे वर्णन करणे ही त्यांच्या मनाची जातकवृत्ती आहे. संतांच्या किंवा परमेश्वराच्या किर्तीचे गायन म्हणजेच भक्ती होय, असा निर्वाळा ज्ञानेश्वर चरित्राच्या प्रारंभी नामदेवांनी दिला आहे. आत्मचिंतनाबरोबरच प्रत्येक प्रसंगाच्या अखेरीस नामदेवाची बोलकी प्रतिक्रिया येते ती अभ्यासण्यासारखी आहे. नामदेवांनी 'आदि' मध्ये ज्ञानदेवांच्या चरित्रविषयक सामग्रीचे निवेदन केले व 'तीर्थावडी' व 'समाधी' ही प्रकरणे स्वतःच्या अनुभूतींना प्रमाण ठेऊन लिहिली. 'अभंग' हे चरित्रकथनाचे माध्यम नामदेवाने बनविले तेही इतक्या सहज की त्यात अभंगरचनेचे श्रम जाणवत नाहीत. प्रसंगीच्या उत्कट भावनेबरोबर भाषा प्रतिमांचा व रूपकांचा आश्रय घेताना दिसते नामदेवांचे चरित्रलेखन वाचत असताना त्यात अनुभवांच्या दोन पातळ्या जाणवतात. एक प्रत्यक्ष वास्तव आणि दुसरे स्वतःच्या भावसामर्थ्याने निर्मिलते आंतरिक अनुभूतीचे स्वप्नवास्तव. या दोन पातळ्यांवर त्यांचे कवियन विहरताना दिसते. नामदेवाने केलेली अभंगात्मक चरित्राची निर्मिती अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत होत राहिली. चरित्रविषयाच्या निवडीबाबत सिद्ध व साधक हा

भेदभाव त्यांनी केला नाही. एकूणच पौराण परंपरेशी नामदेवाने चरित्रात्मक लेखनाचे नाते शोधले. सातशे वर्षांपूर्वी होऊन गेलेले संत नामदेव म्हणजे सर्व दृष्टीने एक अपूर्व चमत्कार होता. समाजरचनेच्या दृष्टीने विशेष महत्वाचे स्थान नसलेला एखादा सामान्य माणूसही असामान्य भक्तीमुळे केवढे अलौकिक यश मिळवितो, याचे प्रत्यंतर म्हणजे नामदेवांचे चरित्र होय. अंगिकारलेल्या जीवनमार्गावर गाढ श्रध्दा ठेवून त्या श्रध्देच्या जोरावर पाषाणात चैतन्य निर्माण करण्याची जादू म्हणजेच नामदेवाचे चरित्र होय.

ज्ञानदेवांचे समकालीन, काहीसे निराळे व्यक्तिमत्व असलेले पण तितकेच कर्तृत्ववान असलेले दुसरे संत म्हणजे नामदेव (१२७०-१३५०) त्याच्या चरित्रातही अनेक वादस्थळे आहेत आणि त्यांच्या नावावर असलेल्या अभंगापैकी नेमके किती अभंग त्याचे आहेत हे ठरविणे दुरापास्त आहे, पण 'भक्तशिरोमणी' म्हणून त्यांची असलेली ख्याती वादातीत आहे. नामदेवांची भक्तीचा, पंढरीचा व विठ्ठलाचा झेंडा पंजाबपर्यंत नेला. तिकडील त्यांची मंदिर आणि शिखांच्या 'ग्रंथसाहेबा'त अंतर्भूत केली गेलेली त्यांची पदे याची साक्ष देत आहेत. नामदेवांच्या गुजरातेती नरसी मेहता व राजस्थानमधील मीराबाई या थोर संतकवींनी केलेला नामदेवांचा गुणगौरव पाहिला म्हणजे नामदेवांच्या कार्याची थोरवी कळून येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये प्रचाराची  व प्रवासाची पुरेशी साधने नसताना नामदेवांनी उत्तरेकडे जाऊन पंन्नास वर्षपर्यंत भागवतधर्माच्या प्रसाराचे अखंड कार्य चालू ठेवले हे महाराष्ट्रालाही अभिमानाचेच आहे. अर्थात हे कार्य करताना नामदेवांनी कोणताही स्थार्थ पदरी बाळगला नव्हता. संत मंडळींनी सुखात राहावे, हरिदास चिरंजीव रहावेत, आणि ज्याच्या मुखी पांडुरंग आहे, त्याचे कल्याण व्हावे एवढीच देवापाशी त्यांची प्रामाणिक मागणी होती. ज्ञानेश्वरप्रणीत भागवत धर्माचा संदेश गावोगावी नेऊन पोहोचविण्याचे कार्य नामदेवांनी केले, म्हणून तेच वारकरी संप्रदायाचे आदय प्रचारक होत. एकाच काळात ज्ञानदेव व नामदेव हे दोन थोर संतकवी महाराष्ट्रात अवतरले व त्यांच्या परस्परांना पोषक अशा जीवनकार्यामुळे महाराष्ट्राच्या सर्व स्तरांतून संतांची एक मालिकाच निर्माण झाली. नामसंकीर्तनाच्या तंद्रीत देहभान हरपून नामदेव चंद्रभागेच्या वाळवंटावर नाचू लागताच खेडयापाडयांतून त्यांच्या अभंगवाणीचे पडसाद घुमू लागले. त्याच्या सहजस्फूर्त उद्गारात शूद्रांना आपल्या अंतःकरणाची ओळख पटली. सावतामाळी, नरहरी सोनार, जगमित्र नागा, चोखामेळा, वगैरे संत नामदेवांच्या सुरात सूर मिळवून गाऊ लागले. त्यांच्या अंतःकरणातील आत्मविष्काराच्या ऊर्मी उफाळून वर आल्या. आणि शेकडो अभंगाच्या रुपाने त्या प्रकट झाल्या.

वाङ्मयसंपदा, विचारप्रणाली, सदाचारसंहिता या तिन्ही बाबतीत वारकरी संप्रदायाने जी अपूर्व देणगी महाराष्ट्रास दिली, तिच्यामागे संत नामदेवांनी महत्वाचा वाटा उचललेला आहे.

भागवत धर्माचे प्रसारक व संवर्धक म्हणून नामदेवांची कामगिरी लोकोत्तर स्वरुपाची आहे. नामदेवांनी हरिनामाची सुकाळ एवढया जीवाभावाने केला की 'विठ्ठलाच्या' नावाला त्यामुळे एक प्रकारची भव्यता प्राप्त झाली. आपण स्वतः व आपले आराध्ये दैवत 'श्री विठ्ठल' यांच्यामधील सहवासात अगर जवळिकेत कसलाही खंड पडू दिला नाही. नामदेवांनी आपल्या कवित्वासाठी, 'भक्ताचे ते गाणेबोगड़िया बोली।ते ते विठ्ठली अर्पियली।।' ही बैठक स्विकारली. याच बरोबर 'तूचि माझे व्रत माझे तीर्थ। तूंचि धर्म अर्थ काम देवा।।' असे आपल्या जीवनातील सार सांगून टाकले आणि 'नाचूं कीर्तनाचे रंगी।ज्ञानदीप लावूं जगी।'भूमिका स्वीकारून भागवत धर्माचा झेंडा हाती घेतला. भागवत धर्माच्या आदय प्रचारकाप्रमाणे नामदेव कीर्तनाचेही प्रवर्तक होते. त्याच्या अभंगवाणीत भक्तीची स्निग्धता व उत्कटता ओतप्रोत भरुन राहिलेली आहे. सहजसुलभ भाषा आणि भक्तीभावनेच्या अनेकानेक छटा हे त्यांच्या वाणीचे विशेष आहेत. जे अभंग सामान्यतः नामदेवांचे मानले जातात, त्यात 'आदि' 'तीर्थावळी' आणि 'समाधी' अशा तीन प्रकरणांचे ज्ञानेश्वर चरित्र आहे. त्या आधारे ते ज्ञानेश्वरांचे आदय चरित्रकार मानले जातात. ज्ञानदेव व नामदेव या दोघांच्या प्रभावामुळे भक्तीगंगेचा प्रवाह महाराष्ट्रात अठरा पगड जातीमध्ये पोहोचला आणि एक प्रकारची आध्यात्मिक लोकशाहीच निर्माण झाली. यातूनच प्रेरणा घेऊन संतांनी अभंग रचना केली व तीद्वारा भक्तीचा व विठ्ठलाचा महिमा गायिला. बध्दावस्थेपासून ते साक्षात्काराच्या अवस्थेपर्यंतच्या परमार्मिक प्रवासातील आपले अनुभव या संतांनी व्यक्त केले होते. नामदेवांच्या मराठी कवितेचे स्वरुप स्वायत्त आहे. अमृताते पैजेसी जिंकण्याच्या अभिनिवेशाने निर्माण झालेली कविता नाही, पण तरीही मनातील उत्कट भाववृत्तीमुळे, प्रगाढ अनुभूतीमुळे आणि अभिजात कवित्वामुळे नामदेवांनी आपल्या अभंगवाणीतून भावरम्यतेची सरोवरे ओसंडू दिली आहेत. ते सहजपणे घडलेले कवित्व आहे.

भारतीय भक्तिसाहित्याचा इतिहास हा एकून बाराशे ते चौदाशे वर्षांचा इतिहास आहे. बाराशे-तेराशे वर्षे भारतात जे भक्तिसाहित्य निर्माण झाले, त्याचा एक घटक असलेले नामदेवांचे काव्य केवळ गुणांनी श्रेष्ठ आणि भारतीय भक्तीसाहित्याचे प्रातिनिधिक आहे, तर त्या काव्याचे स्वतःचे खास वेगळेपण आहे, प्रभाव आहे. म्हणून महत्वपूर्ण स्थान आहे. तात्पर्य इतकेच की आपल्या सगुण भक्तीत रमून, समाजाला मानवतेची उपासना शिकवून, भागवत धर्माची पताका पंढरीपासून से पंजाबपर्यंत नेणाऱ्या नामदेवांचे व्यक्तिमत्व भावयेडे असे आहे. आपल्या अभंगवाणीच्या रूपाने त्यांनी वाचकांशी सख्य जोडले आहे. त्यांची अभंगवाणी म्हणजे त्यांच्या भाववेडया, उदात्त, प्रसन्न, सोज्वळ आणि निष्पाप अशा व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार होय. त्यांच्या काव्यातून त्यांचे प्रांजल, स्फटिकशुभ्र आणि पारदर्शक

असे स्वभावदर्शन घडते. स्वतः नामदेव हाच त्यांच्या काव्याचा विषय आहे. कवी आणि त्याची कविता किती एकरूप असू शकते याचा उत्तम नमुना म्हणजे नामदेवांचा एकेक अभंग होय. मराठीतील पहिले संघटक आणि प्रचारक, कीर्तन परंपरेचे प्रवर्तक, आपल्या शिष्याची बांधणारे गुरु अशा, अनेक दृष्टींनी नामदेवांचे व्यक्तिमत्व संपन्न आहे. समाजमनस्क अशा नामदेवांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला आकार दिला. संतांची अभंगवाणी ही उत्कृष्ट भावकविता आहे याची पहिली प्रचिती नामदेवांच्या अभंगवाणीतून मिळते. म्हणूनच 'नामयाचे बोलणे नव्हे हे कवि ।हा रस अद्भुत निरोपमू' हे त्याच्या काव्याचे ज्ञानेश्वरांनी केलेले वर्णन अक्षरशः खरे आहे. आत्मचरित्र, चरित्र, आख्यानकविता आणि आत्मपर अभंग या सर्वच प्रकारातील त्यांची प्रासादिक काव्यरचना पाहिली म्हणजे नामदेवांच्या काव्याने यादवकालीन मराठी कविता समृद्ध व श्रीमंती केली असे वाटल्याशिवाय राहत नाही.

संदर्भग्रंथ – १) ज्ञानेश्वरांची जीवन निष्ठा- गं. बा. सरदार

२) संत नामदेव – हे. वि. इनामदार

३) प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास – प्रा. डॉ. ल.रा. नसिराबादकर

४) पाच संत कवी – शं. गो. तुळपुळे

५) मराठी वाड्.मयाचा इतिहास (खंडा पहिला – आवृत्ती दुसरी) – ल. रा. पांगारकर